महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती-१२१८/प्र.क्र.४८५/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक ०७ मार्च २०१९.

विषय :- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील सांताक्रुझ (पश्चिम) येथील *"Police Lock up"* इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/ कक्ष-८(११)/ न.क्र.३/ शा.२७०/ २०१८, दिनांक १२.११.२०१८.

ज्ञापन.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांनी सांताक्रुझ (पश्चिम) येथील *"Police Lock up"* इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्ती करण्यासाठी रु.४०,१९,२६५/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे उपविभागीय अभियंता, अंधेरी (सा.बां) उपविभाग, अंधेरी (पश्चिम), यांनी सन २०१७-१८ च्या राज्य ई-दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां) विभाग, यांनी साक्षांकित केले आहे.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले असून ते रु.३८,३८,१००/- असे सुधारित केले आहेत आणि प्रशासकीय मान्यता देण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, सांताक्रुझ (पश्चिम) येथील *"Police Lock up"* इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्ती करण्यासाठी रु.३८,३८,१००/- *(रुपये अडतीस लक्ष, अडतीस हजार, शंभर फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू नये;
२) खर्चाचे अंदाज हे पोलीस सह आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई, यांनी साक्षांकित करावे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५ ००९७), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२२/२०१९/इमा.-२, दिनांक २५.०१.२०१९, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०३०७२०१०५४६९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.03.07 20:12:28 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां) विभाग *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी सुधारलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).